सकाळ
सिंधुदुर्ग, शनिवार,
२६ डिसेंबर २०१५

# घेण्यापेक्षा देण्याचा आनंद अवर्णनीय

## नसीमा हुरजूक : हळबे महाविद्यालयात माय-लेकींचा स्नेहमेळावा

दोडामार्ग, ता. २५ : "समाजात अपंगांबरोबर अनेक दुर्बल घटक हलाखीचे जीवन जगत आहेत. या घटकांसाठी सर्वांनी मदतीचा हात पुढे केला पाहिजे. आपल्याबरोबर या दुर्बल घटकांना पुढे घेऊन गेलो तरच आपला उत्कर्ष होईल. दुर्बलांसाठी काम करणाऱ्या अनेक सेवाभावी संस्थांना मदत करताना ती घेण्यापेक्षा देण्याचा आनंद हा अवर्णनीय असतो," असे प्रतिपादन हेल्पर्स ऑफ दी हँडीकॅप्ड (कोल्हापूर) या संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती नसीमा हुरजूक यांनी काल (ता. २२) केले.

त्या येथील लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयात महिला विकास कक्षाच्या वतीने लेक लाडकी अभियानांतर्गत महाविद्यालयातील विद्यार्थिनी व त्यांच्या आई अर्थात माय-लेकींचा स्नेहमेळाव्यात प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होत्या. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील होते. मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने व सावित्रीबाई फुले व लक्ष्मीबाई हळबे यांच्या प्रतिमा पूजनाने कार्यक्रमाची सुरवात झाली. एकाच कन्याप्राप्तीनंतर कुटुंब नियोजन करणाऱ्या तालुक्यातील माधुरी सावंत, वसुंधरा गवस, वैशाली गवस यांचा, स्वावलंबी अपंग संगीता राऊळ हिचा, कर्तबगार स्त्रिया माधवी मणेरकर, सुजल गवस, तसेच युवती स्वयंनिर्भर निधी अर्थात भाऊबीज निधी जास्त संकलन करणाऱ्या विद्यार्थिनी




दोडामार्ग : श्रीमती नसीमा हुरजूक यांचा सत्कार करताना डॉ. व्ही. ए. पाटील. शेजारी विवेकानंद नाईक, बाबूराव धुरी, सूचन कोरगावकर आदी.

प्रज्ञा शिरोडकर, ज्योती जाधव, महाविद्यालयाच्या वरिष्ठ लिपिक किरण नाईक यांचा पुष्पगुच्छ देऊन श्रीमती हुरजूक यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या वेळी हुरजूक यांनी वृद्धाश्रम काढण्याचे स्वप्न बोलून दाखविले. त्यांच्या जीवन प्रवासावर व कार्यावर आधारित लघुपट दाखविण्यात आला. प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील यांनी प्रास्ताविक केले. हेल्पर्स ऑफ दी हँडीकॅप्ड संस्थेला विद्यार्थिनींनी जमा केलेल्या भाऊबीज निधीतून पाच हजार रुपयांचा धनादेश दिला. सौ. सुजल सूर्यकांत गवस यांनी दोन हजार रुपये आर्थिक मदत दिली. प्राचार्यांच्या हस्ते श्रीमती हुरजूक यांचा श्रीफळ व शाल देऊन सत्कार करण्यात आला. व्यासपीठावर संस्थेचे स्थानिक सदस्य विवेकानंद नाईक, बाबूराव धुरी, सूचन कोरगावकर उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विभागप्रमुख आर. एस. इंगळे, किरण नाईक, सर्व प्राध्यापक, कार्यालयीन कर्मचारी, विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले. किरण नाईक यांनी सूत्रसंचालन केले. पौर्णिमा वराडकर हिने आभार मानले.